# ज्ञानसागर कोचिंग क्लासेस, अहमदनगर

## द्वितीय सत्र परीक्षा

| | | |
|---|---|---|
| इयत्ता – ९ वी | गद्य – ८ ते १५, पद्य–७ ते ११, स्थूलवाचन – ३ ते ५ | वेळ –३ तास |
| विषय – मराठी | | गुण – ८० |

**प्र.१ अ) खालीलपैकी <u>कोणत्याही एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १० ते १२ ओळींत लिहा.** ५

१) इंटरनेटला सर्वात महान क्रांती असे का म्हटले आहे?

२) शीलसंवर्धनासाठी भोपळे महाराज कोणता उपदेश करत?

३) अनिष्ट प्रथेतून आईने मालनची सुटका कशी केली?

**ब) खालीलपैकी <u>कोणत्याही तीन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६ ते ८ ओळींत लिहा.** ९

१) शांतिनाथला कोणती सामाजिक जाणीव होती?

२) संत बसवण्णा व त्यांच्या अनुयायांबद्दल राजाकडे तक्रार का केली गेली?

३) ''तुर्त लग्नाचा विचारसुद्धा मला परवडणारा नाही,'' असे सुभाषचंद्र बोस का म्हणतात?

४) अचानक आपल्या नावाची घोषणा संयोजकांकडून झाल्यावर खाशाबांनी काय केले?

५) थोरातकाकांची तब्येत का सुधारली?

६) 'ई–मेल' चा त्वरित संपर्कासाठी कशाप्रकारे उपयोग केला जातो?

**प्र.२ अ) खालीलपैकी <u>कोणत्याही एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ८ ते १० ओळींत लिहा.** ४

१) महानगरात दिसणारी कोणती नित्याची दृश्ये कवीने चित्रित केली आहेत?

२) आयुष्यातील संकटांचे वर्णन कवीने कोणत्या शब्दांत केले आहे?

३) 'वाट' या कवितेत कवीने जीवनातील विरोधाभास कशा रीतीने वर्णन केला आहे?

**ब) खालीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा.** ६

१) आपणच आपले भाग्य बदलु शकतो, हे कवीने कोणत्या शब्दांत पटवून दिले आहे?

२) पांगळे बंदिस्तपण आणि वादळी आवेग यांच्यातील विरोधाभासातून कवीने काय सुचविले आहे?

३) 'तूच पदराचे शीड उभारलेस,' 'तूच पाठीवर हात ठेवलेस' या ओळींतून कवीने काय सुचवले आहे?

४) नीती आणि पुण्य या संबंधीची जाणीव कवीने कोणत्या शब्दांत व्यक्त केली आहे?

**प्र.३ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** ४

१) 'इन्फर्मेशन सुपरहायवे' साठी मराठीत कोणता शब्द वापरला आहे?

२) जगणं केव्हा सुंदर होऊ शकतं?

३) कवीच्या मते, नव्या जगाचे गान कशामधून जुळेल?

४) आयुष्यभर, कवीच्या स्वागताला कोण आले आहे?

**ब) रिकाम्या जागी पाठ्यपुस्तकातील योग्य शब्द भरुन ती वाक्ये / पद्यपंक्ती पुन्हा लिहा.** ४

१) ही ––––– उत्पन्न करणारी समृद्ध माती असल्यावर न करमायला काय झालं?

२) ––––– शांतीनाथचा गाढ विश्वास होता.

३) हारलो कैकदा ––––– तूच पदराचे शीड उभारलेस.

४) सारखे अस्तित्व माझे पेटताना ––––– दे!

पुढे पहा...

ज्ञानसागर अहमदनगर

**प्र.४ अ) खालीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> अवतरणांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.** ४

१) ''इंटरनेट हे लोकशाहीचे खरेखुरे स्वरुप आहे.''

२) ''इथे माझा नेहमी क्रिएटिव्हशीच संबंध येतो.''

३) ''कसा दिवी यल्लमाचा कोप हुतुया मला बघायचाच हाय!''

४) ''असा निरवारा उगाच पदरी बांधण्यामध्ये काय अर्थ?''

**ब) खालीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> अवतरणांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.** ४

१) 'जणु पायाने चित्त्याच्या अन्<br>
रस्ता झाडी झाडुवाली.'

२) ''इतका वाईट नाही मी, जितका तू आज समजतेस<br>
दाहक नव्हते ऊन जितके तू आज समजतेस.''

३) ''लाभु दे लाचार छाया मोठमोठ्यांना परंतु<br>
तापल्या मातीत माझा घाम मानाने गळु दे''

४) 'मन कुलाचेही असे, कधी काट्यात जळते!'

**प्र.५ अ) खालीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची उत्तरे सुमारे ६० शब्दांपर्यंत लिहा.** ८

१) लेखकाने वोल्गाच्या काठावरील स्मारकाचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे?

२) गोव्यातील शिमगोत्सवाचे वर्णन लेखकाने कोणत्या शब्दांत केले आहे?

३) साम्यवादी शासनप्रणालीमुळे चीनमधील जनजीवन भारतातील जनजीवनापेक्षा वेगळे झाले आहे, याचा प्रत्यय लेखकाला कसा आला?

**प्र.६ खालीलपैकी <u>कोणत्याही एका</u> विषयावर ३०० ते ३५० शब्दांत निबंध लिहा.** १०

१) इंटरनेटचे फायदे

२) 'मी वृक्ष बोलतोय......'

३) अंधश्रद्धा – एक शाप

४) मन करा रे प्रसन्न

**प्र.७ १) खालीलपैकी <u>कोणत्याही एका</u> अलंकाराची लक्षणे सांगून उदाहरण द्या.** २

(१) अनुप्रास (२) उत्प्रेक्षा

**२) खालीलपैकी कोणत्याही एका वृत्ताची लक्षणे सांगून उदाहरण द्या.** २

(१) दिंडी (२) पादाकुलक

(३) आर्या

**३) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समासाचा प्रकार ओळखा. (कोणतेही दोन)** २

(१) आमूलाग्र (२) प्रतिदिन

(३) सहकुटुंब (४) साकार

**४) कंसातील सुचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** २

१) मध्यान रात्र झाली आणि घराजवळच्या लिंबावर घुबड घुमु लागले. (वाक्यप्रकार ओळखा)

पुढे पहा...

ज्ञानसागर अहमदनगर

२) नशिबाने त्यांना साथ दिली. तिसऱ्या फेरीत त्यांना बाय मिळाला. (केवल वाक्य करा.)

३) त्यातूनच एक मोठी ज्ञानगंगा निर्माण झाली आहे. (भूतकाळ करा)

४) त्या पुन:पुन्हा चौकशी करतात. (प्रयोग ओळखा)

**५) खालील शब्द, शब्दसिद्धीच्या कोणत्या प्रकारात येतात ते सांगा. (कोणतेही चार)** २

१) झाड  २) माता

३) आंघोळ  ४) रेडिओ

५) संदेश  ६) जग

**६) अधोरेखित शब्दांचे व्याकरण चालवा. (कोणतेही एक)** २

१) दूरदर्शन <u>आणि</u> रेडिओ <u>यांचे</u> जाळे देशभर पसरले आहे.

२) सनातन्यांनी <u>त्याच्यावर</u> अनेक दोषारोप <u>केले.</u>

किंवा

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. २

१) पगडा असणे  २) हाडाची काडे करणे

३) खोळंबा करणे  ४) रोष पत्करणे

**प्र.८ अ) तुमच्या शाळेत झालेल्या स्नेहसंमेलनाची माहिती तुमच्या आजोबांना सांगण्यासाठी आजोबांना पत्र लिहा.** ४

**(पत्रासोबत लिफाफा काढणे आवश्यक)**

**किंवा**

**शाळेत साजरा झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचा वृत्तान्त लिहा.**

**ब) कवी मंगेश पाडगांवकर, यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम शाळेत सादर करायचा आहे त्याची 'कार्यक्रमपत्रिका' तयार करा.** ४

**किंवा**

**बाजारात एक नवीन शॅम्पू विक्रीला आला आहे. त्या शॅम्पूची जाहिरात करा.**

**प्र.९ अ) खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** ४

इसाप हा मूळचा गुलाम होता; पण पशुपक्ष्यांच्या अगदी समयोचित अशा कल्पित कथा रचण्याचे त्याच्या अंगी जे अनुपम कौशल्य होते, त्यायोगाने मोठमोठ्या राजांच्या दरबारातही त्याची प्रतिष्ठा होऊ लागली. इतकेच नव्हते तर त्याचा सहवास मुत्सद्दी व राजकारणी पुरुष यांनाही अत्यंत प्रिय आणि आदरणीय वाटू लागला.

लोकांचा बुद्धिभेद घालवून त्यांना योग्य मार्गावर आणण्याच्या कामी कल्पित कथांच्या रुपाने त्याने एक नवीन किमयाच उत्पन्न केली, असे त्याच्या वेळच्या लोकांना वाटू लागले.

इसापच्या कल्पित गोष्टी हे एक करमणुकीचे आणि मनोरंजनाचे साधन होय, असेच लोकांना प्रथम वाटत होते. पण त्यात काही बुद्धिवाद्यांना या गोष्टींचे इतके सामर्थ्य जाणवले की, ग्रीस देशात मुलांना नीतिपाठ देण्याचे तेच एक प्रमुख साधन होऊन बसले.

**प्रश्न :**

१) इसाप मूळचा कोण? त्याच्या अंगी कोणते कौशल्य होते? १

२) ग्रीस देशात इसापच्या कथांचा कोणत्या रीतीने वापर केला गेला? १

३) इसापच्या काळातील लोकांच्या मनात इसापच्या कथा वाचून कोणता विचार आला? २

<u>**किंवा**</u>

**वरील उताऱ्याचा १/३ सारांश तुमच्या शब्दात लिहा.** ४

✻✻✻✻✻

ज्ञानसागर अहमदनगर